29 AUG 2023 लोकमत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'इट राइट मिलेट मेला' वॉकेथॉन शिवाजी विद्यापीठात जल्लोषात

## दीड हजार जणांचा सहभाग : भरडधान्यांची केली जागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, केंद्रीय आरोग्य व भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरण (एफ.एस.एस.ए.आय.-पश्चिम विभाग), ज्युबिलंट फूड्स प्रा.लि. (डॉमिनोज) आणि परफेट्टी व्हॅन मिले यांच्यातर्फे सोमवारी विद्यापीठात 'इट राइट मिलेट मेला' या उपक्रमाचा वॉकेथॉनने प्रारंभ झाला. या वॉकेथॉनमध्ये दीड हजाराहून अधिक विद्यार्थ्यांसह कोल्हापूरकर सहभागी झाले.



शिवाजी विद्यापीठात सोमवारी आयोजित 'इट राइट मिलेट मेला'च्या निमित्ताने एरोबिक्स प्रात्यक्षिके घेण्यात आली.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात एरोबिक्स प्रशिक्षणाने उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, एफ.एस.एस.ए.आय.च्या पश्चिम विभागाच्या सहसंचालक के.के. जिथा, उपसंचालक डॉ. के.यू. मेथेकर, अन्न व औषध प्राधिकरणाचे सहायक आयुक्त तुषार शिंगाडे, ज्युबिलंट फूड्सचे व्हाइस प्रेसिडेंट देवेंद्र यादव यांच्या उपस्थितीत वॉकेथॉनचे उद्घाटन झाले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस.एन. सपली, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे विभागप्रमुख डॉ. पी.डी. पाटील, समन्वयक डॉ. इराण्णा उडचान यांचे उपक्रमासाठी सहकार्य लाभले.

29 AUG 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'इट राईट मिलेट मेला' जल्लोषात

## शिवाजी विद्यापीठातील उपक्रमास दीड हजारहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ येथे सोमवारी 'इट राईट मिलेट मेला' या एकदिवसीय उपक्रमास जल्लोषात व आरोग्यदायी वॉकिथॉनने प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठ, केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरण (एफ.एस.एस.ए.आय.-पश्चिम विभाग), ज्युबिलंट फूडस् प्रा.लि. (डॉमिनोज) आणि परफेट्टी व्हॅन मिलेट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या वॉकिथॉनमध्ये दीड हजारहून अधिक विद्यार्थ्यांसह कोल्हापूरकर नागरिकांनी सहभाग नोंदवला.



सकाळी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात एरोबिक्स प्रशिक्षणाने उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. तत्पूर्वी सहभागींना एफ.एस.एस.ए.आय.च्या वतीने मोफत टी शर्टचे वाटप करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, एफ.एस.एस.ए.आय.च्या पश्चिम विभागाच्या सहसंचालक के. के. जिथा, उपसंचालक डॉ. के. यू. मेथेकर, अन्न व औषध प्राधिकरणचे सहायक आयुक्त तुषार शिंगाडे, ज्युबिलंट फूडसचे व्हाईस प्रेसिडेंट (क्वालिटी एश्युरन्स) देवेंद्र यादव आणि परफेट्टी व्हॅन मिलेचे सहायक संचालक प्रभाकर मिश्रा यांच्या उपस्थितीत वॉकिथॉनचा उद्घाटन समारंभ झाला.

वॉकिथॉन यशस्वी होण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे विभागप्रमुख डॉ. पी. डी. पाटील, समन्वयक डॉ. इराण्णा उडचान, एफ.एस.एस.ए.आय.च्या सहायक संचालक ज्योती हर्णे, तांत्रिक संचालक देवांशी चावला यांच्यासह तंत्रज्ञान अधिविभागाच्या शिक्षकांचे सहकार्य लाभले.

### आरोग्यासाठी चाला, सकस आहार घ्या!

चांगल्या आरोग्यासाठी दररोज चालणे हा एक महत्त्वाचा व्यायाम आहेच, त्याबरोबरच सकस व पोषणमूल्यांनीयुक्त आहार घेणे ही आवश्यक बाब आहे. भरडधान्ये ही भारतीय अन्न संस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहेत. त्यांचे महत्त्व नव्याने समजावून घेऊन दैनंदिन आहारात त्यांचा समावेश करण्याचा संदेश या उपक्रमातून घेऊन जायचा आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले.

29 AUG 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जल्लोषी वातावरणात भरडधान्यांची जागृती

## शिवाजी विद्यापीठात 'इट राइट मिलेट मेला' वॉकेथॉन : सुमारे दीड हजार जणांचा सहभाग

कोल्हापूर, ता. २८ : हलगीचा कडकडाट, ढोल-ताशांचा गजर, प्रबोधनपर घोषणा आणि फलक घेऊन उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले विद्यार्थी अशा जल्लोषी वातावरणात शिवाजी विद्यापीठात आज 'इट राइट मिलेट मेला' वॉकेथॉन निघाली. त्याद्वारे भरडधान्यांच्या वापराबाबत जागृती करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरण (एफ.एस.एस.ए.आय.-पश्चिम विभाग), ज्युबिलंट फूड्स प्रायव्हेट लिमिटेड आणि परफेट्टी व्हॅन मिले यांच्यातर्फे आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त 'इट राईट मिलेट मेला' उपक्रम घेण्यात आला. त्याचा प्रारंभ सकाळी वॉकेथॉनने झाला. त्यामध्ये दीड हजारांहून अधिक विद्यार्थ्यांसह कोल्हापूरकरांनी सहभाग घेतला.

आज सकाळी साडेसहा वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात एरोबिक्स प्रशिक्षणाने उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, एफ.एस.एस.ए.आय.च्या पश्चिम विभागाच्या सहसंचालक के. के. जिथा, उपसंचालक डॉ. के. यू. मेथेकर, अन्न व औषध प्राधिकरणाचे सहाय्यक आयुक्त तुषार शिंगाडे, ज्युबिलंट फूड्सचे उपाध्यक्ष (क्वलिटी इश्युरन्स) देवेंद्र यादव आणि परफेट्टी व्हॅन मिलेचे सहाय्यक संचालक प्रभाकर मिश्रा प्रमुख उपस्थित होते. या वॉकेथॉनचे संयोजन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे विभाग प्रमुख डॉ. पी. डी. पाटील, समन्वयक डॉ. इराण्णा उडचान, एफ.एस.एस.ए.आय.च्या सहाय्यक संचालक ज्योती हर्णे, तांत्रिक संचालक देवांशो चावला आदींनी केले.



**कोल्हापूर : भरडधान्यांच्या जागृतीसाठी जल्लोषी वातावरणात शिवाजी विद्यापीठात 'इट राइट मिलेट मेला' वॉकेथॉन काढण्यात आली.**

### आरोग्यासाठी चाला, सकस आहार घ्या

■ 'चांगल्या आरोग्यासाठी व्यायामासह सकस व पोषणमूल्यांनी युक्त आहार घेणे आवश्यक आहे. भरडधान्ये ही भारतीय अन्नसंस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहेत. त्यांचे महत्त्व नव्याने समजावून घेऊन आपल्या दैनंदिन आहारात त्यांचा समावेश करण्याचा संदेश आजच्या उपक्रमातून प्रत्येक सहभागीने आपापल्या कुटुंबियांपर्यंत आणि पर्यायाने संपूर्ण समाजापर्यंत घेऊन जावयाचा आहे', असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

## कल्पक पाककृती, ज्ञानखेळाने रंगला 'इट राईट मिलेट मेला'

आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात कल्पक पाककृती, ज्ञानखेळाने आज 'इट राईट मिलेट मेला' रंगला. विद्यापीठाच्या अन्न विज्ञान व तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांसह परिसरातील विविध अन्नविज्ञान महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी भरडधान्यांपासून अनेकविध कल्पक पाककृती सादर केल्या. बारामती येथील महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनीही स्टॉल प्रदर्शनात मांडले होते. भरडधान्य भेळ, शेवचाट, मिश्र भरडधान्यांचे मफिन्स, बाजरीची लापशी, पनीर, भरड टिक्की, खाकरा, उपवासाचा डोसा, नाचणीची अंबिल, नाचणीचे गुलाबजाम, नाचणी मिल्कशेक, भरडधान्य मिश्र कोल्ड कॉफी, कटलेट, भरडधान्य ढोकळा, भरड धान्य मोदक, खीर आदी पाककृती विद्यार्थ्यांनी सादर केल्या. बचतगटांनीही भरडधान्यांसह पारंपरिक पदार्थ विक्री करण्यासाठी स्टॉल मांडले होते. ज्युबिलंट फूड्सचे उपाध्यक्ष देवेंद्र यादव यांनी भरडधान्यांपासून बनविलेला पिझ्झा खास तयार करून सादर केल्याचे सांगितले.

29 AUG 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'इट राइट मिलेट मेला' वॉकेथॉन जल्लोषात

## विद्यापीठातील उपक्रमास दीड हजारांहून अधिक विद्यार्थी, नागरिकांचा सहभाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरण (एफ.एस.एस.ए.आय.-पश्चिम विभाग), ज्युबिलंट फूड्स प्रा.लि. (डॉमिनोज्) आणि परफेट्टी व्हॅन मिले यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त विद्यापीठात 'इट राईट मिलेट मेला' या एकदिवसीय उपक्रमास मोठ्या जल्लोषात व आरोग्यदायी वॉकेथॉनने प्रारंभ झाला. या वॉकेथॉनमध्ये दीड हजारांहून अधिक विद्यार्थ्यांसह नागरिकांनी सहभाग नोंदविला.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सकाळी साडेसहा वाजता एरोबिक्स प्रशिक्षणाने उपक्रमास प्रारंभ झाला. तत्पूर्वी, सहभागींना एफ.एस.एस.ए.आय.च्या वतीने मोफत टी शर्टचे वाटप करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एफ.एस.एस.ए.आय.च्या पश्चिम विभागाच्या सहसंचालक के. के. जिथा, उपसंचालक डॉ. के. यू. मेथेकर, अन्न व औषध प्राधिकरणाचे सहाय्यक आयुक्त तुषार शिंगाडे, ज्युबिलंट फूड्सचे व्हाईस प्रेसिडेंट (क्वालिटी एश्यूरन्स) देवेंद्र यादव आणि परफेट्टी व्हॅन मिलेचे सहाय्यक संचालक प्रभाकर मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून वॉकेथॉनला प्रारंभ झाला. वॉकेथॉनमध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी भरडधान्यांच्या अनुषंगाने जागृतीपर घोषणा देत होत्या. त्याचप्रमाणे भरडधान्याचे महत्त्व दर्शविणारे फलकही त्यांनी हाती धरले होते. तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांचे झांजपथक ढोल-ताशाच्या गजरात सहभागी झाले. त्याचप्रमाणे हलगीचा कडकडाटही सहभागींना अधिक जोमाने चालण्यासाठी प्रेरणा देत होता. वॉकेथॉन यशस्वी होण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, फूड सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजीचे विभाग प्रमुख डॉ. पी. डी. पाटील, समन्वयक डॉ. इराण्णा उडचान, एफ.एस.एस.ए.आय.च्या सहाय्यक संचालक ज्योती हर्णे, तांत्रिक संचालक देवांशी चावला यांच्यासह तंत्रज्ञान अधिविभागाच्या शिक्षकांचे सहकार्य लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'इट राइट मिलेट मेला'च्या निमित्ताने आयोजित वॉकेथॉनमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. के. यू. मेथेकर, विद्यार्थी, कर्मचारी आदी सहभागी झाले होते.

### आरोग्यासाठी चाला; सकस आहार घ्या : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

चांगल्या आरोग्यासाठी दररोज चालणे हा एक महत्त्वाचा व्यायाम आहेच, पण त्याचबरोबर सकस व पोषक आहार घेणे आवश्यक आहे. भरडधान्ये ही भारतीय अन्नसंस्कृतीचा महत्त्वाचा घटक आहेत. त्यांचे महत्त्व नव्याने समजावून घेऊन आपल्या दैनंदिन आहारात त्यांचा समावेश करण्याचा संदेश आजच्या उपक्रमातून प्रत्येक सहभागीने आपापल्या कुटुंबियांपर्यंत आणि पर्यायाने संपूर्ण समाजापर्यंत घेऊन जावयाचा आहे.

विद्यापीठाच्या अन्न विज्ञान व तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांनी भरडधान्यांपासून भेळ, शेवचाट, मफिन्स, बाजरीची लापशी, पनीर, भरड टिक्की, खाकरा, उपवासाचा डोसा, नाचणीची अंबिल, गुलाबजाम, मिल्कशेक, कटलेट, ढोकळा, मोदक, खीर, प्रोसो कढाई पुलाव, इलेट (इटालियनमिलेट) नुडल्स, पॅन केक्स, इन्स्टंट बाजरी खीर, बाजरी स्वीट मोमोज्, एकूण ३५ स्टॉलवर खवैयांची गर्दी होती.

2 9 AUG 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात 'इट राइट मिलेट मेला'

# नको सँडविच, नको पिझ्झा.. विद्यार्थ्यांना भरड धान्याची भुरळ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : फास्टफूडच्या जमान्यात पारंपरिक खाद्याची चव आता दुर्मीळ झाली आहे. त्यात तरुणाईच्या खाण्या-पिण्याच्या सवयी विचारायलाच नको. मात्र, शिवाजी विद्यापीठात भरड धान्याच्या जनजागृतीसाठी सोमवारी आयोजित केलेल्या 'इट राइट मिलेट मेला' या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. बाजरी, नाचणी, वरी, ज्वारीपासून बनवलेल्या विविध खाद्यपदार्थांवर विद्यार्थी अक्षरश तुटून पडले. विशेष म्हणजे भरड धान्यापासून बनवलेले नूडल्स, केक, कोल्ड कॉफीच्या चवीने विद्यार्थ्यांना भुरळ पाडली.

आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ व भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणतर्फे सोमवारी विद्यापीठात भरडधान्य जागृतीसाठी 'इट राइट मिलेट मेला' उपक्रमाचे आयोजन केले होते. यात विद्यापीठाच्या फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांसह स्वंसहायता बचत गटांनी ५० स्टॉल उभारले आहेत.

यात फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांचे ३५ तर बचत गटाचे १५ स्टॉल होते. या सर्व स्टॉलवर भरडधान्यापासून बनवलेले पदार्थ ठेवले होते. या पदार्थांची चव चाखण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसोबतच शहरातील नागरिक, तरुणाईची या स्टॉलवर झुंबड उडाली. वरीपासून बनवलेली खीर, रागीपासून बनवलेले नूडल्स खाण्यासाठी मोठी गर्दी झाली होती.

## लापसीची चवच न्यारी

विद्यार्थ्यांच्या एका स्टॉलवर बाजरीपासून बनवलेल्या लापसीची चव घेण्यासाठी मोठी गर्दी झाली. ज्वारी, बाजरी, नाचणी यांचे मिश्रण करून तयार केलेल्या कोल्ड कॉफीने विद्यार्थ्यांचे भान हरपून गेले. कोल्ड कॉफीपेक्षा भरड धान्यापासून बनवलेली ही कॉफी सरस असल्याच्या भावना अनेकांनी व्यक्त केल्या. 'इट राइट मिलेट मेला'मध्ये आयोजित विविध स्पर्धांना महाविद्यालयीन, शालेय विद्यार्थ्यांचाही प्रतिसाद लाभला.

## स्पर्धेतील विजेते

**भरडधान्यावर आधारित स्टॉल -**

- प्रथम संघ - भक्ती संजय पाटील, सय्यद उमर मोईन, अनिता शिवाजीराव राठोड, स्नेहल खंडू मोरे, अनुराधा अनिल पाटील
- द्वितीय संघ- संदेश जितेंद्र अणुस्करे, आदित्य मिलिंद बर्वे, तेजस्विनी रवींद्र शिंदे, ऋषिकेश रवींद्र भुले
- तृतीय संघ- केतकी संतोष लब्दे, सुनिधी विनोद कुलकर्णी, साक्षी मीनार यादव, सोनिया सुरेश पाटील, मंजू राजेश खांडोलकर.

**छायाचित्रण स्पर्धा :** प्रथम - प्रथम सर्वदे, द्वितीय- ओंकार अनिल म्हेत्रे, तृतीय- आदित्य सी. पोटे

**पोस्टर निर्मिती** (नववी ते बारावी गट- मिलेट माइंड फुलनेस) : प्रथम- अनुष्का शिंदे, (श्री.वसंतराव चौगुले हायस्कूल, कोल्हापूर), द्वितीय- रुद्र कांथणे (कोल्हापूर पब्लिक स्कूल), तृतीय- अनन्या रुद्र कुंभार वसंतराव चौगुले हायस्कूल).

**युजी-पीजी-पीएच.डी. मिलेटस्** (भारतातील कुपोषणाला पूर्णविराम) : प्रथम - सिमीन सुहेल बागवान (कमला कॉलेज, कोल्हापूर), द्वितीय- श्रावणी हिरानाथ सावंत (बी. टेक. - फुडटेक), तृतीय- ऋतुजा संजय वाडकर (कमला कॉलेज).

29 AUG 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या कुलसचिवपदासाठी आज मुलाखती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदासाठी अंतिम मुलाखती मंगळवारी(ता.२९) होणार आहेत. त्यासाठी एकूण १६ उमेदवार पात्र ठरले आहेत. विद्यापीठ प्रशासनाने या कुलसचिवपदासाठी २० जुलै २०२२ रोजी पुन्हा प्रक्रिया सुरू झाली. त्यामध्ये अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी १६ जण मुलाखतीच्या अंतिम प्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. त्यात विद्यापीठातील चार जणांचा समावेश आहे.

मुलाखतीची प्रक्रिया सात सदस्यीय निवड समिती राबविणार आहे.

दरम्यान, या पदावर निवड होण्यासाठी काही उमेदवारांनी राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या आहेत. दीड वर्षानंतर पूर्णवेळ कुलसचिव मिळणार असल्याने त्याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

तरूण भारत

# कुलसचिव पदाच्या आज मुलाखती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कुलसचिव पदाच्या मुलाखती आज होणार आहेत. कुलसचिव पदासाठी १६ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील विद्यमान कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. संजय कुबल, डॉ. एम. के. भानारकर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे यांचा समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा कार्यकाल संपल्यानंतर या पदावर प्रभारी कुलसचिव म्हणून डॉ. व्ही. एन. शिंदे कार्यरत आहेत. यापुर्वी कुलसचिव पदाच्या मुलाखत वादग्रस्त ठरल्याने निवड समितीने या पदावर कोणाचीच निवड केली नाही. आता डॉ. महेश कोकाटे, डॉ. विजय कुंभार, डॉ. पी. बी. पाटील, डॉ. बाजीराव पाटील यांच्यासह १६ सदस्यांचे अर्ज मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत.